दैनिक अन्यायाचा प्रतिकार, महाराष्ट्राचा बुलंद आवाज मुख्य संपादक : सुनील कृष्णाजी पोतदार

# रायगड नगरी

www.raigadnagari.com
/ raigadnagari

वर्ष २० वे | अंक २५० | MAHMAR/2006/17212 | रायगड | रविवार, दि.७ डिसेंबर २०२५ | किंमत १ ₹ | पृष्ठे ४ | रायगडसह ठाणे, नवी मुंबई, पुणे येथून प्रकाशित

## चोरी करून पळून गेलेल्या आरोपीला गुजरातमधून घेतले ताब्यात

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल शहरातील हॉलमार्क मोटर लिंकस् येथून १ लाख ८१ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल चोरून पळून गेलेल्या दुकलीपैकी एकाला पनवेल शहर पोलिसांनी गुजरातमधून ताब्यात घेतले आहे.

पनवेल शहरातील पनवेल इंडस्ट्रीयल को.ऑ. इस्टेट लिमीटेड मधील हॉलमार्क मोटर लिंकस् एल.एल.पी., (रॉयल इनफील्ड) येथून लिनोव्हा कंपनीचा लॅपटॉप, दोन मोबाईल फोन व १ लाख ७० हजार रोख रक्कम चोरीला गेल्याची घटना घडली होती. याप्रकरणी पनवेल शहर पोलिसांकडे गुन्हा दाखल होताच वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उप निरीक्षक हजरत पठाण, पोहवा कुडावकर, पोना प्रविण मेथे व पोशि शशीकांत काकडे आदींच्या पथकाने तांत्रिक तपासाच्या आधारे शोध घेतला असता आरोपी मुरली उर्फ अलेक्स पवार (रा. वलसाड, गुजरात) याला गुजरात येथून ताब्यात घेतले असता त्याने त्याचा साथीदार दिनेश माहिते (रा. वलसाड, गुजरात) याच्या साथीने चोरी केल्याची माहिती दिली. त्याच्याकडून पोलिसांनी ५० हजार रुपये जप्त केले असून त्याचा दुसरा साथीदार दिनेश माहिते याचा शोध पोलीस घेत आहेत.

# ‘...तर उपमुख्यमंत्रीपदही रद्द करा’

### उद्धव ठाकरेंची सरकारकडे मोठी मागणी

**दै.रायगड नगरी । मुंबई**

शिवसेना (उबाठा) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी राज्यातील नगरपालिका निवडणुका, मतदार याद्यांमधील त्रुटी, शेतकरी पॅकेज आणि विरोधी पक्षनेतेपद यांसारख्या महत्त्वाच्या मुद्द्यांवरून सध्याच्या सरकारवर जोरदार टीका केली आहे. निवडणुकांमध्ये हुकूमशाही वाढत असून 'बूथ कॅप्चरींग' ऐवजी आता 'निवडणूकच कॅप्चर' करण्याचा प्रकार सुरू असल्याचा गंभीर आरोप त्यांनी केला.



मतदार याद्यांमधील घोळ इतका मोठा आहे की, सर्वोच्च न्यायालयाने यावर स्वतःहून लक्ष घालून लोकशाहीसाठी महत्त्वाच्या असलेल्या या विषयावर त्वरित हस्तक्षेप करावा, अशी मागणी त्यांनी केली. जोपर्यंत मतदार याद्यांमधील विसंगती दूर होत नाही, तोपर्यंत निवडणुका घेऊ नयेत, असेही ते म्हणाले.

ठाकरे यांनी राज्यात विरोधी पक्षनेतेपद अद्यापही रिक्त ठेवल्याबद्दल तीव्र नाराजी व्यक्त केली. विधिमंडळाच्या पहिल्या अधिवेशनापासून या पदाची मागणी असूनही एक वर्षानंतरही ते रिक्त आहे, हे इतिहासात प्रथमच घडत आहे, असे ते म्हणाले. सरकारला विरोधी पक्षनेतेपदाची भीती का वाटते, असा सवाल त्यांनी उपस्थित केला. जर कायद्याचा हवाला देऊन ही भूमिका घेतली जात असेल, तर उपमुख्यमंत्रीपदाचे कायदेशीर अस्तित्व नसल्याने तेही रद्द करावे, अशी मागणी त्यांनी केली.

शेतकरी पॅकेजबाबत बोलताना ठाकरे यांनी मुख्यमंत्र्यांवर टीका केली. मुख्यमंत्र्यांना केवळ उलट उत्तर देता येते, सरळ उत्तर देत नाहीत, असा आरोप त्यांनी केला. केंद्र सरकारचे आभार मानताना, केंद्रीय कृषी मंत्र्यांनी राज्य सरकारची 'सोंग उघडली', त्यामुळे त्यांचे आभार, असे उपहासाने सांगितले. राज्यात ओला दुष्काळ जाहीर करण्याची गरज असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले.

ओला दुष्काळ ही संज्ञा नाही असे म्हटल्याने तो टाळला जाऊ शकत नाही, असे ते म्हणाले. शेतकऱ्यांच्या खात्यात प्रत्यक्ष पैसे कधी येणार आणि प्रस्ताव सादर झाल्यानंतर प्रक्रिया किती वेळ घेणार, याबाबतही ठाकरे यांनी प्रश्न उपस्थित केले.

दरम्यान, मंत्री मंगलप्रभात लोढा यांच्या तीन पक्षांचे नाव वेगवेगळे पण मालक एकच या वक्तव्यावर प्रतिक्रिया देताना ठाकरे म्हणाले, तिन्ही पक्षांचे नेते एकच आहेत, प्रत्यक्षात त्यांची बी-टीम आहे. दिग्विजय सिंह यांच्या भेटीवर ठाकरेंनी खुलासा केला की, ही वैयक्तिक भेट होती. आमची ओळख पूर्वीपासून आहे. ते बऱ्याच दिवसांनी मुंबईत आले होते, त्यामुळे भेट झाली, असे त्यांनी सांगितले. सरकारवर कठोर टीका करताना ठाकरे यांनी लोकशाही धोक्यात असल्याचा आरोप केला आणि आगामी निवडणुका पारदर्शक रित्या पार पडाव्यात, अशी मागणी केली.

# स्कुटीची मोटार सायकलला धडक ; २ ठार २ जखमी

**दै.रायगड नगरी । विश्वास निकम**

**कोलाड ।** कोलाड रोहा मार्गांवर संभे गावाच्या हद्दीतील मोरी जवळ स्कुटी चालक यांनी मोटार सायकल चालकाला जोरदार धडक दिली या अपघातात दोन जन ठार तर दोन जन जखमी झाल्याची घटना घडली.

सविस्तर वृत्त असे कि पोलिस सूत्रांकडून मिळालेल्या माहिती नुसार शुक्रवार दि.५/१२/२०२५ रोजी रात्री २१.३० च्या सुमारास दिनेश भिकू पवार हा त्याच्या ताब्यातील होंडा शाईन मोटार सायकल क्र.एम.एच.०६बि. जे. ३३१८वरून धाटाव ते कोलाड असा प्रवास करीत असतांना यातील मयत आरोपी स्कुटी चालक जावीर इब्राहिम शाह रा. धाटाव ता.रोहा यांने आपल्या ताब्यातील स्कुटी एम. एच.०६सी.बी. ३७०१ही स्वतः चालवीत त्या स्कुटीच्या पाठीमागे जखमी साक्षीदार याला बसवून कोलाड ते धाटाव असा प्रवास करीत असतांना मौजे संभे गावाच्या हद्दीत मोरिजवळ आले असता यातील मयत दिनेश भिकू पवार याच्या ताब्यातील होंडा शाईन मोटार सायकल यास रॉंग साईडला येऊन जोरदार धडक दिल्याने या अपघातात दिनेश भिकू पवार याच्या मरणासह स्वतःच्या मरणास कारणीभूत ठरले.



या अपघातात दिनेश भिकू पवार, विठ्ठल नगर, पो. रातवड,ता. माणगांव,जि. रायगड तसेच जावीर इब्राहिम शाह रा. धाटाव मुळगाव सिधावे टोला रामटोकोला कसीया कशिनगर उत्तरप्रदेश, हे दोघे जन ठार तर अशपाक मोहम्मद फारूख अली, रा. वार्ड नं.१०शक्ती नगर कसीया कुशीनगर उत्तरप्रदेश व मोहन पवहारी सिंग रा. सिधावे टोला रामटोकोला कसीया कुशीनगर उत्तरप्रदेश हे दोघे जन जखमी झाले आहेत. याचा अधिक तपास उपविभागीय पोलिस अधिकारी प्रसाद गोकुळे सो. रोहा, सपोनि कुलकर्णी सो. नागोठणे पोलिस कार्यभार कोलाड यांच्या मार्गदर्शनाखाली कोलाड पोलिस अंमलदार पोसई भोजकर करीत आहेत.

# बनावट नोटा तयार करणाऱ्या दोघांना ३ वर्षांचा सश्रम कारावास

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

पेण पोलिसांच्या अथक प्रयत्नांमुळे आणि सखोल तपासामुळे बनावट नोटा तयार करणाऱ्या दोघांना अखेर शिक्षा झाली आहे. मुंब्रा येथील मोहम्मद आवेश मोहम्मद अकबर शेख आणि त्याचा साथीदार सोहेल शरफराज खान यांना अलिबाग सत्र न्यायालयाने बनावट नोटा तयार करणे, बाळगणे आणि वापरणे या गुन्ह्यांसाठी प्रत्येकी ३ वर्षांचा सश्रम कारावास आणि एकूण ३५ हजार रुपयांचा दंड ठोठावला आहे. मार्च २०२२ मध्ये उघडकीस आलेल्या या बनावट चलन रॅकेटने परिसरात खळबळ उडवली होती. आरोपींनी १०० रुपयांच्या बनावट नोटा तयार करून त्या चलनात आणण्याचा प्रयत्न केला होता. हे दोन्ही गुन्हेगार २४-ते २८ वयोगटातील आहेत.

पोलिसांनी केलेल्या तपासात असे समोर आले की, हे दोघेही त्यांच्या क्विव्हा स्कूटीमध्ये बनावट नोटांचा साठा आणि त्या तयार करण्यासाठी लागणारे प्रिंटर, कागद, शाई यांसारखे साहित्य घेऊन फिरत होते. पेण शहरातील दुकानांमध्ये या बनावट नोटा वापरून किरकोळ खरेदी करणे आणि त्या बदल्यात खऱ्या नोटा परत घेणे, अशी त्यांची पद्धत होती.

एका दुकानदाराने, फिर्यादी गिरीष गणेश पाटील यांनी, त्यांच्या दुकानात बनावट नोट दिल्याचे लक्षात येताच तात्काळ पोलिसांना माहिती दिली. यानंतर गुन्हा रजि. नं. ३८/२०२२ दाखल करण्यात आला. या प्रकरणाचा तपास अत्यंत वैज्ञानिक पद्धतीने करण्यात आला. पंच साक्षीदार, घटनास्थळाचा पंचनामा, जप्त केलेल्या नोटांचे तांत्रिक विश्लेषण आणि पोलिसांच्या तातडीच्या कारवाईमुळे आरोपींचे गुन्हे न्यायालयासमोर ठोसपणे सिद्ध झाले. या खटल्यात अति. सरकारी अभियोक्ता श्रीमती कोमल राठोड यांनी प्रभावी युक्तिवाद केला. त्यांनी १३ महत्त्वाच्या साक्षीदारांची तपासणी करून आरोपींनी बनावट चलन तयार केले, बाळगले आणि वापरले हे निर्विवादपणे सिद्ध केले. न्यायालयाने तपास अधिकारी पोलीस निरीक्षक डी.आर. पोळ यांच्या तपासाचे विशेष कौतुक केले.

न्यायालयाने भारतीय दंड विधान (भादंवि) कलम ४८९(अ), ४८९(ब), ४८९(क) आणि ४८९(ड) अंतर्गत दोन्ही आरोपींना प्रत्येकी ३ वर्षे सश्रम कारावास आणि २०,००० व १५,००० रुपयांचा दंड सुनावला. दंड न भरल्यास त्यांना अतिरिक्त कारावास भोगावा लागेल. या शिक्षेमुळे बनावट चलन तयार करून अर्थव्यवस्थेला धोका निर्माण करणाऱ्यांना एक कडक संदेश मिळाला आहे, अशी प्रतिक्रिया नागरिकांमध्ये उमटत आहे. पेण पोलिसांच्या या कारवाईचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## रविवारी ‘राज्यस्तरीय अटल करंडक’ एकांकिका स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ

**दै.रायगड नगरी । पनवेल**

शहरातील आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ पुरस्कृत आणि अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद पनवेल शाखा व चांगू काना ठाकूर महाविद्यालय (स्वायत्त) यांच्या संयुक्त विद्यमाने सुरु असलेल्या १२ व्या राज्यस्तरीय अटल करंडक एकांकिका स्पर्धेच्या महाअंतिम फेरीचा पारितोषिक वितरण समारंभ रविवार दिनांक ०७ डिसेंबरला सायंकाळी ०४ वाजता होणार आहे.

या महाअंतिम फेरीचा पारितोषिक वितरण समारंभ माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली होणार असून या स्पर्धेतील विजेत्या एकांकिकेला ०१ लाख रूपये आणि मानाचा 'अटल करंडक' देऊन मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात येणार आहे. या वर्षी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा अमृत महोत्सव वर्ष असून या महत्वपूर्ण वर्षानिमित्त यंदा दोन रंगकर्मींचा 'गौरव रंगभूमीचा' पुरस्काराने गौरव करण्यात येणार आहे. त्यानुसार ज्येष्ठ रंगकर्मी नीना कुलकर्णी आणि सुनील बर्वे यांचा सन्मान करण्यात येणार आहे.

या सोहळ्याला सन्माननीय उपस्थिती म्हणून माजी नगराध्यक्ष जे. एम. म्हात्रे, भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी तर प्रमुख पाहुणे म्हणून सुप्रसिद्ध अभिनेते गिरीश ओक, सुप्रसिद्ध दिग्दर्शिका प्रतिमा कुलकर्णी, सुप्रसिद्ध अभिनेते सुनील तावडे, अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद मध्यवर्ती मुंबई प्रमुख कार्यवाह अजित भुरे, सुप्रसिद्ध अभिनेता जयवंत वाडकर, भरत सावले, सुप्रसिद्ध नाट्य निर्मात्या कल्पना कोठारी, अटल करंडक ब्रँड अँम्बेसिडर सुप्रसिद्ध अभिनेते सुव्रत जोशी, अभिनेते व दिग्दर्शक प्रमोद शेलार, प्रमोद अत्रे यांची उपस्थिती लाभणार आहे. तसेच भाजपचे पनवेल शहर अध्यक्ष सुमित झुंझारराव, खारघर मंडल अध्यक्ष प्रवीण पाटील, कळंबोली मंडल अध्यक्ष अमर पाटील, कामोठे मंडल अध्यक्ष विकास घरत, उत्तर मंडल अध्यक्ष दिनेश खानावकर, नवीन पनवेल अध्यक्ष दशरथ म्हात्रे, दक्षिण मंडल अध्यक्ष मंगेश वाकडीकर आदींची प्रमुख उपस्थिती असणार आहे. त्याचबरोबर या दिवशी प्रसिद्ध मराठी अभिनेते, दिग्दर्शक पुष्कर श्रोत्री त्यांच्या खास शैलीत बहारदार सूत्रसंचालन करणार आहेत. तसेच बक्षिस वितरण सोहळ्याच्या दिवशी हास्यजत्रा फेम अरुण कदम, श्याम राजपूत व चेतना भट त्याचबरोबर हास्य सम्राट विजेते प्रा. दीपक देशपांडे यांचा मनोरंजनात्मक कार्यक्रम होणार आहे. या महाअंतिम फेरीच्या अनुषंगाने नाट्य एकांकिकांचा रसिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ व अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद पनवेल शाखेचे अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, मंडळाचे उपाध्यक्ष अरुणशेठ भगत, अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद पनवेल शाखेचे उपाध्यक्ष व स्पर्धा प्रमुख परेश ठाकूर, अटल करंडक आयोजन कमिटीचे उपाध्यक्ष विलास कोठारी, सीकेटी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. के. पाटील आणि टीम अटल करंडक यांनी केले आहे.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त महापालिकेच्या वतीने अभिवादन

**दै.रायगड नगरी । पनवेल**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त महापालिकेच्या वतीने आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत त्यांच्या स्मारक ठिकाणी पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी अतिरिक्त आयुक्त गणेश शेटे, सहाय्यक संचालक (नगररचना) केशव शिंदे, उपायुक्त डॉ. वैभव विधाते, उपायुक्त प्रसेनजित कारलेकर, उपायुक्त मंगल माळवे, उपायुक्त स्वरूप खारगे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी मंगेश गावडे, मुख्य लेखा परीक्षक निलेश नलावडे, शहर अभियंता संजय कटेकर, कार्यकारी अभियंता विलास चव्हाण माजी महापौर डॉ. कविता चौतमोल, माजी नगरसेवक, महापालिका अधिकारी व कर्मचारी, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



या प्रसंगी मार्गदर्शन करताना आमदार प्रशांत ठाकूर म्हणाले, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेले योगदान महत्त्वपुर्ण होते. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास वंदन करताना हा फक्त अभिवादनाचा क्षण नाही, तर एका क्रांतिकारी विचारवंताच्या आदर्शांना पुनःश्रद्धांजली अर्पण करण्याची संधी आहे. असा महापुरुष पुन्हा होणे नाही असे गौरवोद्गार यावेळी त्यांनी काढले.

भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिनानिमित्त पनवेल महानगरपालिकेच्या सर्व शाळां मध्ये बालसभांचे व विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. सर्व शाळांमध्ये भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण अभिवादन करण्यात आले. तसेच यावेळी भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याविषयी विद्यार्थ्यांना माहिती देण्यात आली. महापरिनिर्वाण दिनाचे औचित्य साधून सर्व शाळांध्ये निबंध ,भाषण ,चित्रकला, रंगभरण स्पर्धा घेण्यात आल्या.

तसेच काही शाळांमध्ये नृत्य,गायन सादरीकरण करण्यात आले. शिक्षणाधिकारी रमेश चव्हाण, सर्व मुख्याध्यापक, शिक्षकांच्या उपस्थितीत हे कार्यक्रम आयोजित करण्यात आले.

# राज्यामध्ये संविधानविरुद्ध कटकारस्थान : खा.सुप्रिया सुळे



**दै.रायगड नगरी । मुंबई**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्याला फक्त संविधानच दिलं नाही तर, पाणी पुरवठा आणि वीज निर्मिती बाबत दूरदृष्टीने धोरणे आखली. त्यांनी दाखवून दिलेल्या मार्गाने जात असताना राज्यामध्ये संविधानविरुद्ध कटकारस्थान होत आहे, हे दुर्दैवी आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमधील घटना, मारामाऱ्या संविधान विरोधी आहेत, अशी टीका राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या (शरद पवार) कार्याध्यक्ष खासदार सुप्रिया सुळे यांनी केली.

महापरिनिर्वाण दिनानिमित्त चैत्यभूमीवर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन केल्यानंतर त्या पत्रकारांशी बोलत होत्या. इंदु मीलची जागा मिळाल्यानंतरही बाबासाहेबांचे स्मारक करण्यासाठी इतका उशीर का होत आहे ? मोठमोठे रस्ते आणि प्रकल्प होतात. पण, आपल्या आस्था आणि श्रद्धास्थान असलेले स्मारक का पूर्ण होत नाही ? याचे उत्तर महाराष्ट्र सरकारला द्यावेच लागेल.

आमच्या पक्षाची अनेक वर्षांपासून दादर रेल्वे स्थानकाचं नाव हे ‘डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्थानक’ असे करावे, अशी मागणी आहे.

आम्ही संसदेतही रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांच्याकडे ही मागणी केली आहे. परंतु, केंद्र सरकारच्या अकरा वर्षांच्या कार्यकाळात आम्हाला अद्याप न्याय मिळालेला नाही, असेही सुळे म्हणाल्या.

# पुतीन परतले, पुढे...?

रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतीन यांच्या भारत दौऱ्याकडे संपूर्ण जगाचे लक्ष लागले होते. त्यामागील कारण म्हणजे जागतिक समीकरणे झपाट्याने बदलत असताना पुतीन यांचा भारत दौरा झाला. एका बाजूला डोनाल्ड ट्रम्प यांच्या नेतृत्वाखाली अमेरिका जगाच्या शक्तिसंतुलनात नव्या अक्षांकडे झुकत आहे, तर दुसरीकडे चीनचा विस्तारवाद सर्वकाही गिळंकृत करण्याच्या घाईत आहे. पश्चिमेकडे युरोप, पूर्वेकडे आशिया, मध्यपूर्व आशियात उफाळत असलेले संघर्ष आणि दक्षिण आशियात होत असलेल्या उलथापालथीच्या छायेत झालेली पुतीन यांची भारत भेट शिष्टाचाराचा भाग असली तरी, जागतिक परिस्थितीला वळण देणाऱ्या प्रक्रियेची ती एक मोठी खूण ठरू शकते. भारतासाठी हा दौरा प्रतिकात्मकतेपेक्षा व्यावहारिक पातळीवर अधिक महत्त्वाचा होता. अमेरिका आणि भारतातील संबंध गेल्या काही वर्षांत सर्वोच्च उंचीवर पोहोचले होते; परंतु अलीकडे ते शीतयुद्धकालीन पातळीवर पोहोचतात की काय, अशी आशंका व्यक्त होऊ लागली आहे. ट्रम्प यांच्या कठोर, पारंपरिक, उजवीकडे झुकलेल्या आणि अस्थिर धोरणांमुळे भारताला आता स्पष्ट संदेश मिळू लागला आहे. या पार्श्वभूमीवर पुतीन यांचा दौरा पर्यायी सत्तासंतुलनाची दारे नव्याने उघडणारा ठरू शकतो. भारताच्या दृष्टीने गेल्या दोन-तीन वर्षांत घडलेला कदाचित सर्वात धक्कादायक बदल म्हणजे पाकिस्तानचे पुन्हा अमेरिकेच्या कवेत जाणे! एकेकाळचे अमेरिकेचे हे लाडके बाळ एकविसाव्या शतकात नावडते झाले होते; परंतु अलीकडे हे बाळ पुन्हा अमेरिकेच्या मांडीवर खेळू लागले आहे. त्याबरोबरच एक वर्तुळ पूर्ण होताना दिसत आहे. शीतयुद्धाच्या काळात पाकिस्तानला अमेरिकेच्या गोटातील, तर भारताला तत्कालीन सोव्हिएत रशियाच्या गोटातील समजले जात असे. कालांतराने पाकिस्तान अमेरिकेपासून दुरावत गेला आणि भारत निकट होत गेला; पण आता ट्रम्प यांची धोरणे भारताला पुन्हा एकदा रशियाच्या जवळ जाण्यास भाग पाडत आहेत. पुतीन यांच्या दौऱ्याला त्यामुळेच अधिक महत्त्व प्राप्त झाले आहे. चीनची अफगाणिस्तान आणि मध्यपूर्वेतील वाढती सक्रियता अमेरिकेला पाकिस्तानला हाताशी धरण्यास भाग पडत आहे. भारताशी उभा दावा मांडलेल्या पाकिस्तानवर एकाच वेळी अमेरिका आणि चीनसारख्या महाशक्तींचा वरदहस्त असणे, ही भारतासाठी अत्यंत चिंतेची बाब ठरते. या पार्श्वभूमीवर भारतालाही जागतिक पटलावर रशियासारख्या बड्या देशाची साथ आवश्यक ठरते. त्यामुळेच अमेरिका आणि युरोपियन संघाची कितीही इच्छा असली तरी, भारत रशिया-युक्रेन युद्धात युक्रेनची बाजू घेऊ शकत नाही. केवळ युक्रेनच नव्हे, तर चीनच्या संदर्भातही भारताने आपली री ओढावी, चीनसोबतच्या त्यांच्या संघर्षात भारताने आघाडीवर असावे, अशी अमेरिका आणि युरोपियन संघाची इच्छा आहे. पुतीन यांच्या भारत दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर, तीन प्रमुख युरोपियन देशांच्या भारतातील राजदूतांनी संयुक्तरीत्या लेख लिहून, भारताच्या युक्रेनसंदर्भातील भूमिकेवर आगपाखड केली; पण भारताने त्यांच्यासमोर मान झुकवायला नकार दिला आहे. पुतीन भारतात असताना, पंतप्रधान नरेंद्र मोदींनी युक्रेन युद्धासंदर्भात व्यक्त केलेले मत सुस्पष्ट आहे. पुतीन यांच्या दौऱ्यात भारत व रशियादरम्यान काही महत्वपूर्ण संरक्षण, तंत्रज्ञानविषयक करार झाले. तेदेखील अमेरिका आणि युरोपला खटकते. भारताने आपल्याकडून शस्त्रास्त्रे घ्यावी, अशी त्यांची इच्छा आहे; पण रशियाने भारतात जी विश्वासार्हता निर्माण केली आहे, ती आपल्या दुटप्पी, स्वार्थी आणि बदलत्या धोरणांमुळे आपण निर्माण करू शकलो नाही, याकडे ते डोळेझाक करतात. भारताने आपल्या ताटाखालील मांजर व्हावे ही अमेरिका-युरोपियन संघाची इच्छा आहे. रशियाने शीतयुद्धाच्या काळातही तशी अपेक्षा केली नाही. मध्यंतरी भारताने अमेरिका आणि युरोपियन देशांसोबत संरक्षणासह अनेक क्षेत्रांत संबंध दृढ केले; पण रशियाने त्यावर कधीच आक्षेप घेतला नाही! चांगल्या-वाईट काळात रशियाने भारताला नेहमीच साथ दिली आहे. भारताने अलीकडे आत्मनिर्भरतेचा वसा घेतला असला तरी, ऊर्जा, संरक्षण, विज्ञान-तंत्रज्ञान या क्षेत्रांमध्ये अजूनही बरीच मजल मारायची आहे आणि या सर्वच क्षेत्रांत रशियाने भारताला नेहमीच सहकार्य केले आहे. पाकिस्तान-अमेरिका समीकरणाचा पुनर्जन्म, चीन-पाकिस्तान अक्षाचा विस्तार, अमेरिका-युरोपचा वाढता दबाव, ही आव्हाने पुढ्यात असताना, पुतीन यांच्या भेटीने भारताला एक मजबूत पर्याय, तर रशियाला जागतिक राजकारणात आधार मिळेल! कदाचित त्यातून नवे जागतिक शक्ती-संतुलनही उदयास येईल!

### खोपोली नगरपरिषदेला ISO 9001:2015 प्रमाणपत्र

# मुख्याधिकारी पंकज पाटील यांच्या पुढाकारामुळे गुणवत्ता व्यवस्थापनात मोठी कामगिरी

**दै.रायगड नगरी । खोपोली**

खोपोली नगरपरिषदेला आंतरराष्ट्रीय दर्जा व्यवस्थापन मानांकन ISO 9001:2015 प्राप्त झाले असून नगरपरिषदेच्या सेवांच्या गुणवत्ता वृद्धीकडे हे महत्त्वाचे पाऊल मानले जात आहे. ROHS Certification Pvt. Ltd. यांच्या वतीने हे प्रमाणपत्र ५ डिसेंबर २०२५ रोजी प्रदान करण्यात आले.



ही उल्लेखनीय कामगिरी साध्य करण्यामागे मा. मुख्याधिकारी खोपोली नगरपरिषद पंकज पाटील यांचा पुढाकार, प्रभावी नेतृत्व व सातत्यपूर्ण पाठपुरावा यांचा मोठा वाटा आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली नगरपरिषदेतील कार्यपद्धतीत सुधारणा, आधुनिक तंत्रांचा वापर, पारदर्शकता आणि नागरिक-केंद्रित सेवा यावर विशेष भर देण्यात आला. ISO 9001:2015 प्रमाणपत्राचे क्षेत्र नागरी मूलभूत सेवा, स्वच्छता व कचरा व्यवस्थापन, सार्वजनिक आरोग्य, पाणीपुरवठा व वितरण, रस्ते देखभाल, सार्वजनिक प्रशासन तसेच परवाने व प्रमाणपत्रे जारी करणे या सेवांपर्यंत मर्यादित आहे.

प्रमाणपत्राची वैधता ४ डिसेंबर २०२८ पर्यंत राहणार असून पहिली सर्व्हिलन्स तपासणी ०५ नोव्हेंबर २०२६ रोजी आणि दुसरी तपासणी ०५ नोव्हेंबर २०२७ रोजी होणार आहे.

नागरिकांना अधिक गुणवत्तापूर्ण, जलद व कार्यक्षम सेवा उपलब्ध करून देण्यासाठी या मानांकनामुळे खोपोली नगरपरिषद सक्षम होत असल्याचे मत प्रशासकीय व नागरिक स्तरावरून व्यक्त करण्यात येत आहे. या यशाबद्दल नगरपरिषद प्रशासन, अधिकारी व कर्मचाऱ्यांचे सर्वदूर अभिनंदन केले जात आहे.

# एड्स जनजागृतीसाठी अलिबागमध्ये बाईक रॅलीस उत्स्फूर्त प्रतिसाद

**दै.रायगड नगरी । रत्नाकर पाटील**

**अलिबाग ।** जागतिक एड्स नियंत्रण दिन व पंधरवडा कार्यक्रमाचे औचित्य साधून युवकांच्यामध्ये एच.आय.व्ही.एड्स विषयी जनजागृती करण्याचे उद्दिष्ट समोर ठेवून अलिबाग येथे बाईक रॅली काढण्यात आली. अलिबाग समुद्रकिनारा येथून अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. शीतल जोशी-घुगे यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून बाईक रॅली मार्गस्थ करण्यात आली.



यावेळी निवासी वैद्यकीय अधिकारी (बाह्य) डॉ. किरण शिंदे, प्रशासकीय अधिकारी डॉ. प्रवीण कंदाडे, एचओडी पीसीएम नाझिया, एचओडी एसएमटी डॉ. साक्षी पाटील, दालसा मुख्य अँड. सी.सी. कामथे, अध्यक्ष, निहा घरत, लायन्स क्लब श्रीबाग सेन्टिनिअल, अँड .निहा राऊत, फॉऊंडर मेंबर, अँड. अंकित बंगेरा, वनगे, सदस्य लायन्स क्लब हे उपस्थित होते.

महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण सोसायटी अंतर्गत जिल्हास्तरीय एड्स प्रतिबंध व नियंत्रण विभाग जिल्हा सामान्य रुग्णालय अलिबाग यांच्यामार्फत सदर बाईक रॅलीचे आयोजन करण्यात आले. यावेळी संजय माने, तपस्विनी गोंधळी, स्पर्धा विश्व अकॅडमी, अलिबाग आदि मान्यवर उपस्थित होते.

या वेळी महेश गोसावी , मंगेश पाटील, श्रीम. प्रिया निवाते व श्रीम. आरती राजपूत, श्रीम. अर्चना जाधव, सौ. सुजाता तुळपुळे, सौ. अश्विनी कदम याना सन्मानित करण्यात आले.तर उत्कृष्ट कामगिरी केलेबाबत गणेश सुतार,अतिश नाईक, रुपेश पाटील, तसेच प्रोत्साहनपर कामगिरी केलेल्या लोकपरिषद, पनवेल, महाराष्ट्र सामाजिक विकास ट्रस्ट, पेण, आधार ट्रस्ट पनवेल या एनजीओ प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. तर इंडेक्स टेस्टिंग मध्ये उत्तम काम केलेबाबत रिलायन्स हॉस्पिटल लोधिवली यांस प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. याप्रभात फेरीत शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, होमिओपॅथिक मेडिकल कॉलेज, नर्सिंग स्कूलच्या विद्याथी विद्यार्थिनी सहभाग घेतला. या कार्यक्रमाचे स्वागत संजय माने , सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन सौ. रश्मी सुंकले, यांनी केले.

# प्रकल्प स्तरीय क्रिडा स्पर्धेत पिंगळस आश्रम शाळा चॅम्पियन ट्राफिचे मानकरी

**दै.रायगड नगरी । संजय गायकवाड**

**कर्जत ।** कर्जत तालुका हा बहुल आदिवासी भाग असून, अनेक आदिवासी भागातील विद्यार्थी हे शासकीय आश्रम शाळेत शिक्षण घेत आहेत. याच आदिवासी विद्यार्थी व विद्यार्थीनी साठी पेण प्रकल्प आदिवासी विकास विभाग अतर्गत शासकीय माध्यमिक व उच्च माध्यामिक आश्रम शाळा ही पिंगळस येथे कार्यरत आहे.



या आश्रम शाळेमध्ये चौथ्या वर्षीचे प्रकल्प स्तरीय क्रिडा स्पर्धांचे २०२५-२६ असे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धांमध्ये रत्नागिरी, रायगड जिह्यातील २४ शाळामधील काही शासकीय तर काही आनुदानीत आश्रम शाळेतील एकूण १२३५ विद्यार्थी, विद्यार्थांनी खेळात सहभाग घेतला होता.

या स्पर्धांमधील कबड्डी, खो-खो, हॉलीबॉल,रनिंग,हॅन्डबॉल, गोळाफेक, रिले, लांबउडी यासारख्या स्पर्धा जिंकून रायगड, रत्नागिरी जिल्ह्यातील शाळामधून अव्वल गुण मिळवून प्रकल्प स्तरीय क्रिडा स्पर्धत तिस-यांदा कर्जत तालुक्यातील पिंगळस शासकीय आश्रम शाळा ही विद्यार्थी व विद्यार्थिनींच्या उत्कृष्ट खेळातील कामगिरीच्या जोरावर चॉम्पियन ट्राफिची मानकरी ठरली आहे.

प्रकल्प स्तरीय क्रिडा स्पर्धाचे उद्घाटन अपर आयुक्त आदिवासी विभाग ठाणे गोपीचंद सुंदराबाई मुरलीधर कदम, प्रकल्प अधिकारी ए.आ.वि. प्रकल्प पेण तेजस्विनी मंगल रघुनाथ गलांडे, प्रमुख उपस्थिति उपजिल्हाधिकारी आंतरराष्ट्रीय धावपटू उपायुक्त नवी मुंबई म.न.पा. ललिता नर्मला शिवाजी बाबर -भोसले, यांच्यासह आयोजक मुख्याध्यापक तथा क्रिडासंचालक प्रकल्प स्तरीय क्रिडास्पर्धा पेण रमेश द्रौपदी साहेबराव चव्हाण यांच्या हस्ते दिपप्रज्वोलीत करून छत्रपती शिवाजी महाराज, डॉ.बाबासाहेब आंबेडकर,आदिवासी क्रांतीकारक बिरसा मुंडा,सरस्वती प्रतिमेला हार अर्पण करून क्रीडा स्पर्धांना सुरुवात करण्यात आली.

शासकिय माध्यमिक उच्च माध्यामिक आश्रम शाळा पिंगळस येथे चौथा वर्षीचे स्पर्धचे नियोजन पेण प्रकल्प स्तरीय रायगड,रत्नागीरी जिल्हयातील एकूण २४ शाळेतील एकूण १२३५ विद्यार्थी,विद्यार्थिनी सहभाग घेऊन आपले क्रीडा कौशल्य आपआपल्या खेळामधून प्रदर्शित केले आहे.

या स्पर्धत कबड्डी, खो- खो,हॅलीबॉल,रनिंग, हॅन्डबॉल,लांबउडी, या स्पर्धा तीन दिवासाच्या खेळवल्या गेल्या. या स्पर्धाना दि. २९ नोव्हेबर पासून सुरु करण्यात आली असुन, त्या आलेल्या क्रीडा स्पर्धांचे दि.१ डिंसेबर रोजी बक्षिस वितरण करून तीन दिवशीय प्रकल्प स्तरीय क्रिडा स्पर्धा खेळवल्या गेल्या आहे. शेवटच्या दिवशी बक्षिस वितरण, परितोषिक घेऊन सर्व शाळा त्याच दिवशी आपल्या शाळेवर परतीच्या प्रवासानी निघून गेल्या. यावेळी पेण प्रकल्प सहय्याक अधिकारी,तालुक्यातील आदिवासी समाज संघटना कर्जत, आदिवासी महादेव कोळी समाज संघटना पदाधिकारी,सर्व शाळेचे मुख्याध्यापक, अध्यक्षक, शिक्षकवृद, वर्ग चार चे कर्मचारी हे उपस्थित होते.

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त अनेकांकडून अभिवादन



**दै.रायगड नगरी । दिपक लोके**

**पेण ।** ६ डिसेंबर महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा महापरिनिर्वाण दिनी या दिनास आज ६९ वर्ष पूर्ण होत असताना या निमित्ताने देशातील लाखों भीम अनुयायी दादर चैत्यभूमी येथे जाऊन बाबासाहेबांना नतमस्तक होतात त्याच अनुषंगाने आज सकाळपासूनच पेण शहरातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याला अनेकांकडून अभिवादन करण्यात आले.

यावेळी पेण डीवायएसपी जालिंदर नालकुल, पोलीस निरीक्षक संदीप बागुल यांच्यासह पोलीस अधिकारी, कर्मचारी यांनी तर काही राजकीय मंडळींसह सामाजिक संघटनांमधील माजी नगरसेवक पांडुरंग जाधव, बौद्ध महासभेचे शहराध्यक्ष आनंद जाधव, माजी नगरसेवक जनार्दन जाधव, नागेश सुर्वे, वंचित बहुजन आघाडीचे सुनील धामणकर, पीअ-ारपीचे जिल्हाध्यक्ष सिताराम कांबळे, प्रभाकर घायतले यांच्यासह महिलावर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.



**भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त पनवेल भाजपच्यावतीने अभिवादन करण्यात आले. भाजपच्या मध्यवर्ती कार्यालयात आमदार आमदार प्रशांत ठाकूर, जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत, जिल्हा सरचिटणीस ॲड. प्रकाश बिनेदार, पूर्व मंडल अध्यक्ष भूपेंद्र पाटील, माजी नगरसेवक संतोष भोईर, मागासवर्गीय सेलचे जिल्हाध्यक्ष अमित जाधव, युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष आनंद ढवळे, प्रीतम म्हात्रे, प्रकाश खैरे यांच्यासह कार्यकर्त्यांनी बाबासाहेबांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.**

# पनवेल मनपा मतदार यादीतील १२,१४३ दुबार नावे हटवा

### शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) जिल्हाप्रमुख शिरीष घरत यांचे पनवेल मनपाला थेट आव्हान

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल महानगरपालिका (PMC) सार्वत्रिक निवडणूक २०२५ च्या तोंडावर एक अत्यंत गंभीर आणि धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे! महापालिकेच्या प्रारूप मतदार यादीत थेट १२,१४३ दुबार आणि संशयित मतदारांची नावे घुसल्याचा खळबळजनक दावा शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे ) जिल्हाप्रमुख शिरीष घरत यांनी केला आहे.



सदर नावे जिल्ह्याबाहेरील, म्हणजेच नवी मुंबईतील बेलापूर आणि ऐरोली विधानसभा मतदारसंघातील असल्यामुळे, आगामी निवडणुकीच्या निष्पक्षतेवरच मोठे प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे.रायगड जिल्हाप्रमुख शिरीष घरत यांनी पनवेल महानगरपालिकेच्या आयुक्त/प्राधिकृत अधिकारी (मतदार यादी) यांना तातडीने निवेदन देऊन या 'महागोंधळा'वर कारवाईची मागणी केली आहे.स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत स्थानिक मतदारच असणे कायद्याने बंधनकारक असताना, पनवेल मनपाच्या यादीत नवी मुंबईतील मतदारांचा ढिग आढळला आहे. बेलापूर मतदारसंघ (विधानसभा १५१) ते पनवेल मनपा यादीत ६,१३८ दुबार/ संशयित नावे तर ऐरोली मतदारसंघ (विधानसभा १९०) ते पनवेल मनपा यादीत ६,००५ दुबार/संशयित नावे असून या संशयित मतदारांची संख्या एकूण १२,१४३ इतकी आहे. राज्य निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार, विधानसभा मतदार याद्यांची प्रभाग निहाय फोड करून स्थानिक निवडणुकांची यादी तयार केली जाते.मात्र,पनवेल मनपाच्या यादीत जिल्ह्याबाहेरील मतदार घुसल्याने मतदानाच्या वैधतेवरच थेट आक्षेप घेण्यात आला आहे.

प्रारूप यादीवर हरकती घेण्याची अंतिम मुदत ३ डिसेंबर २०२५ होती.यापूर्वीच्या विधानसभा निवडणुकीतही मोठ्या प्रमाणावर दुबार नावे आढळली होती, पण त्यावेळी कोणतीही कठोर कारवाई झाली नव्हती. त्यामुळे यंदा याच 'बोगस' मतदारांच्या जीवावर निवडणुकीचे निकाल फिरवले जाण्याची भीती व्यक्त होत आहे. शिरीष घरत यांनी मागणी केली आहे की, या १२,१४३ दुबार मतदारांची कठोर शाहनिशा करावी आणि अंतिम यादीत त्यांच्या नावांसमोर विशिष्ट चिन्हांकन करावे. तसेच, मतदाराचे मतदान एकाच केंद्रात होण्यासाठी नियोजन करण्याची विनंती त्यांनी आयुक्तांना केली आहे. जर या त्रुटी वेळीच सुधारल्या नाहीत, तर संपूर्ण निवडणुकीच्या प्रक्रियेवर आणि निकालावर याचा गंभीर परिणाम होऊ शकतो.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

## पोलादपूर तालुका विज्ञान प्रदर्शनाचा झाला राजकीय आखाडा

# चांद्रयान ३ ठरले विज्ञान प्रदर्शनाचे विशेष आकर्षण

**दै.रायगड नगरी । शैलेश पालकर**

**पोलादपूर ।** तालुका विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन नरवीर तानाजी विद्यालय देवळे येथे करण्यात आले असता मुदतपुर्ण झालेल्या माजी जि.प. व पं.स. सदस्यांची राजकीय भाषणे शाळकरी विद्यार्थ्यांसमोर प्रेरणादायी ठरली.

यावेळी व्यासपीठावर रायगड जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष चंद्रकांत कळंबे, पोल-ादपूर पंचायत समितीचे माजी उपसभापती शैलेश सलागरे, शाळा समिती अध्यक्ष ज्ञानदेव केसरकर, माजी सरपंच व भाजपचे माजी तालुकाध्यक्ष तुकाराम केसरकर, गटशिक्षणाधिकारी सुभाष साळुंखे, गणित विज्ञान मंडळाचे अध्यक्ष सुरेश साबळे, मारुती कळंबे, विजय पवार, ज्ञानोबा रेणोसे ,विक्रम केसरकर, शिवाजी केसरकर, आनंद केसरकर, विनायक केसरकर, धर्मेंद्र रिंगे मुख्याध्यापक राकेश पिंगळा, किसन सुरवसे, नवाज तांबोळी, टी डी जाधव, सुनील शिंदे, शिक्षकेतर संघटनेचे जिल्हा उपाध्यक्ष विद्य-ाधर कोळसकर आदींसह बहुसंख्येने शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी व बाल वैज्ञानिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



या विज्ञान प्रदर्शनात तालुक्यातील सर्व शाळेतून सुमारे ४० प्रतिकृती प्रदर्शनात मांडण्यात आल्या. देवळे विद्यालयाचे विज्ञान शिक्षक सुखलाल बागुल यांनी तयार केलेली प्रतिकृती चांद्रयान ३ ही प्रतिकृती विशेष आकर्षण ठरली.

दुर्गम पोलादपूर तालुक्यात रोजगार संधी उपलब्ध नसल्याने स्थलांतरामुळे प्राथमिक व माध्यमिक शाळा बंद पडण्याची शक्यता निर्माण झाली आहे. पोलादपूर तालुक्यातील १०० ते १२५ प्राथमिक व माध्यमिक शिक्षक शासनाच्या धोरणानुसार अतिरिक्त झाले असल्याची चिंता उद्घाटनपर भाषणात रायगड जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष चंद्रकांत कळंबे यांनी व्यक्त करत विज्ञान प्रदर्शनातून एखादा विद्यार्थी मिसाईल मॅन अब्दुल एपीजे अब्दुल कलाम निर्माण होऊ शकतात अशी गुणवत्ता असल्याने व्यवसाय निर्मिती द्वारे स्थलांतर रोखण्यासाठी प्रयत्न आवश्यक आहेत. यासाठी उद्योग मंत्री उदय सामंत व रोहयो मंत्री भरत गोगावले यांच्या माध्यमातून ही समस्या सोडविण्यासाठी प्रयत्नशील असल्याचे अभिवचन कळंबे यांनी दिले. पोलादपूर पंचायत समितीचे माजी उपसभापती शैलेश सलागरे यांनी, भविष्यात शाळा बंद झाल्यास पोलादपूरकरांचे भवितव्य काय ? असा प्रश्न उपस्थित करून या ठिकाणी पर्यटन, उद्योग, व्यवसाय निर्मितीसाठी भरतशेठ गोगावले यांच्या माध्यमातून कळंबे यांनी प्रयत्न करावे अशी अपेक्षा व्यक्त केली.

यावेळी महाडचे माजी पं.स. सभापती तथा रायगड शिक्षण प्रसारक मंडळाचे खजिनदार संजय चिखले यांनी, वैज्ञानिक दृष्टिकोनातून जाणीव व जागृती होण्यासाठी विज्ञान प्रदर्शन महत्त्वाचे आहे असे सांगितले. नताावि देवळे शाळा समितीचे सभापती ज्ञानदेव केसरकर यांनी स्थलांतर रोखण्यासाठी तालुक्यात मेडिकल व इंजिनिअरिंग कॉलेज होणे गरजेचे असल्याचे सांगून शाळेचा १४ वर्षे १०० टक्के निकाल असल्याची माहिती शाळा दिली. याप्रसंगी गणित विज्ञान अध्यापक मंडळ अध्यक्ष सुरेश साबळे यांनी प्रास्ताविक केले. गटशिक्षणाधिकारी सुभाष साळुंखे यांनी विज्ञान प्रदर्शनाची संकल्पना विशद केली.

# तळा तालुका विज्ञान प्रदर्शनात डॉ प्र.म.जोशी प्रशाला पन्हेळी हायस्कूलचे सुयश

**दै.रायगड नगरी । किशोर पितळे**

**तळा ।** अ. ल. लोखंडे विद्यालय पिटसई येथे २२वे तालुका विज्ञान प्रदर्शन दि २ व ३ डिसेंबर २०२५ रोजी पार पडले.या प्रदर्शनात डॉ प्रभाकर महादेव जोशी प्रशाला पन्हेळी विद्यालयातर्फे इ. ९ वी तील सानिया गणपत राणे या विद्यार्थ्यांनीने सोलरवर चालणारे गवत कापणी यंत्र या प्रतिकृती सह सहभाग नोंदविला सदर प्रतिकृतीस माध्यमिक गट (इ.९वी ते १२ वी) गटात प्रथम क्रमांक प्राप्त झाला.तसेचवत्कृत्व स्पर्धेत द्वितीय व निबंध स्पर्धेत तृतीय क्रमांक प्राप्त केला.

सदर विद्यार्थ्यांनीस विद्यालयाच्या विज्ञान शिक्षिका देवयानी राकेश मोरे यांनी मार्गदर्शन केले सदर यशाबद्दल सदर विद्यार्थ्यांनी चे व मार्गदर्शक शिक्षकांचे संस्था अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव व सर्व पदाधिकारी, शाळा समिती चेअरमन व सर्व सदस्य, विद्यालयाच्या मुख्याध्यापिका व शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचारी, पंचक्रोशीतील ग्रामस्थ, पालक वर्ग व माजी विद्यार्थी यांनी अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठीशुभेच्छा दिल्या जात आहेत.




# कुष्ठरोग शोध मोहिमेत २३ कुष्ठरुग्ण सापडले

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल तालुक्यामध्ये १७ नोव्हेंबर ते २ डिसेंबर २०२५ या कालावधीत कुष्ठरोग शोध मोहीम अभियान राबविण्यात आले.

पनवेल तालुक्यामध्ये ग्रामीण भागातून ७२ हजार ९७४ घरांना भेटी देऊन त्यामधील ३ लाख ७५ हजार ६६० लोकांची तपासणी करण्यात आली. यासाठी एकूण २६० पथके व ५१ पर्यवेक्षकांची नेमणूक करण्यात आली होती. या मोहिमे दरम्यान १४ दिवसांमध्ये २ हजार ९५२ संशयित रुग्णांची तपासणी केली. त्यापैकी एकूण २३ रुग्णांना कुष्ठरोगाची लागण झाल्याची आढळून आले. या रुग्णांवर उपचार सुरू करण्यात आले. जानेवारी २०२५ पासून डिसेंबर महिन्यात ८६ कुष्ठ रुग्णांवरती उपचार चालू आहेत. ही मोहीम तालुका आरोग्य अधिकारी डॉ.अपर्णा सागर पवार यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आली.

या मोहिमेमध्ये संशयित कुष्ठरुग्ण तपासणीचे काम प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ. सायली मानकर, डॉ. अस्मिता बोंबटकर, डॉ. प्रभाकर पाटील, डॉ. आकाश वावेकर, डॉ. प्रणव उरणकर व तालुका पर्यवेक्षक राजेंद्र वानखडे, शरद बडे व डॉ. संदिप तोडकर यांनी केले.

---

मा.बडगुजर साहेब

अॅड. मिरदे के.आय.
मो.न. ९८२१४९२१४१

## जाहीर नोटीस

मे. पनवेल येथील दिवाणि न्यायाधीश (व. स्तर) यांचे न्यायालयात
प्रोबेट दि.चौ.अर्ज नं.१४८६/२०२५
नि.नं.८/ड
ने.ता.३०/०१/२०२६

श्री. शंकर लाल चौहान
वय ८५ वर्षे धंदा निवृत्त.
रा. फ्लॅट न. ४०४ ४था मजला विश्वकर्मा टॉवर,
अन्नपूर्णा महिला मंडल अरुणा असफ अली ११५
को. ऑ. हौसिंग सोसायटी लि. प्लॉट न.४ सेक्टर-२१
खारघर ता. पनवेल जि. रायगड महाराष्ट्र-४१०२१० अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही सामनेवाले

वरील अर्जदार यांची पत्नी कै. वीना शंकर लाल चौहान ही दिनांक ४.८.२०२५ रोजी इ-८०२ के बी रॉयल फीओनीक्स पंचश्लोक रेसिडेंसी जवळ चंदखेडा अहमदाबाद पो. चंदखेडा जि. अहमदाबाद गुजरात-३८२४२४ येथे मयत झाली. कै. वीना शंकर लाल चौहान यांचे नावे असलेल्या मिळकतीबाबत त्यांनी अर्जदार यांचे लाभात दिनांक ६.७.२००९ रोजी मृत्युपत्र करण्यात आलेला असून ते पनवेल दूय्यम निबंधक पनवेल-१ यांच्याकडे नोंदणीकृत करण्यात आलेले असून नोंदणी न. पवल-१-०३९९८-२००९ आहे. यांच्या नावे असलेली स्थावर मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे-

**मालमत्ता परिशिष्ट**

फ्लॅट नं. ४०४ ४ था मजला विश्वकर्मा टॉवर अन्नपूर्णा महिला मंडल अरुणा असफ अली को. ऑ. हौसिंग सोसायटी लि. प्लॉट न.४ सेक्टर-२१ खारघर ता. पनवेल जि. रायगड़ महाराष्ट्र-४१०२१० क्षेत्रफळ ५९.५५ चौ. मी. ब्युल्टप एरीया.

३० वरील मिळकतीबाबत अर्जदाराने प्रोबेट मिळणेबाबत अर्ज दिलेला आहे. तरी वरील प्रोबेट बाबत ज्या कोणाचे हक्क अधिकार अशी कोणत्याही प्रकारची तक्रार वैगेरे असल्यास तशी लेखी हरकत नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून दिवंसाचे आत योग्य कागदपत्रासहीत या न्यायालयातदाखल करावी. वरील पद्धतीने कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदारच्या विनंतीप्रमाणे प्रोबेट देण्यात येईल त्यानंतर आलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही.

आज दि.०६/१२/२०२५ रोजी माझ्या सहीने व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/-**
**क.लिपीक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

---

मा.बडगुजर साहेब

प्रो.जमा रु.५०/- अर्जदार तर्फे वकिल, अॅड. श्री. मनोज म्हात्रे
अॅड, ज्योती सरोदे

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे. दिवाणी न्यायाधिश साहेब, वरीष्ठ स्तर यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्रं.१४४५/२०२५
नि.नं.७/ड
ने.ता.१७/०१/२०२६

१) अफसाना बेगम मोहम्मद जैनुल्ला शेख
वय -५१ वर्षे, धंदा गृहिणी,
२) नेहा मोहम्मद जैनुल्ला शेख
वय-२४ वर्षे, धंदा नोकरी
३) मोहम्मद रेहान मोहम्मद जैनुल्ला शेख
वय-२२ वर्षे, धंदा नोकरी
वरील तिघे राहणार- नुरी मजिद जवळ,
करबला चाल, जनता नगर मंडाला, मानखुर्द,
गोवंडी, मुंबई, महाराष्ट्र - ४०० ०४३ अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही

तमाम जनतेस या नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार क्र. १ यांचे पती आणि २ व ३ यांचे वडील मयत मोहम्मद जैनुल्लह इस्माइल मसूद असून त्यांचा मृत्यू दिनांक १६/११/२०२४ रोजी छत्रपती शिवाजी महाराज हॉस्पिटल, ठाणे येथे झालेला असून मयत मोहम्मद जैनुल्लह इस्माइल मसूद यांच्या नावे मालकी हक्कात स्व-संपादित असलेल्या निवासी सदनिका आणि व्यापारी गाळे या मिळकतींचे सविस्तर वर्णन खालील प्रमाणे आहे.

**अ) निवासी सदनिका मिळकतीचे वर्णन**

मयत मोहम्मद जैनुल्लह इस्माइल मसूद हे हयात असताना त्यांच्या मृत्यू पुर्वी त्यांचे मालकी हक्कात स्वसंपादीत मौजे-तळोजा पाचनंद ता. पनवेल, जि. रायगड येथे नोंदणी क्र. पवल-२, दस्त क्र. ३१०/२०१३ दि. १०/०१/२०१३ रोजी या नोंदणीकृत दस्तातील पान क्र. ३७ व ३८ मध्ये नमुद केलेली खालील वर्णनाची निवासी सदनिका आहे.

निवासी सदनिकेचे अॅग्रीमेंट फॉर सेल मध्ये नमूद इंग्रजीमध्ये वर्णन खालील प्रमाणे आहे.

FIRST SCHEULE ABOVE REFERRED TO
Description of the lease hold land

All those Piece or parcel of land lying being and situated at the village- Taloje- Panchnand, Tal. Panvel, Dist. Raigad bearing Plot No. 4 Sector No. 11 of 12.5% (Erstwhile Gaothan Expansion Scheme) Scheme] admeasuring 1999-92 Sq. Mtrs. Which is bounded as follows:

ON OR TOWARES THE EAST: Plot No. 5, 6, 7 & 8
ON OR TOWARES THE WEST: 20.0 mtr. Wide Road
ON OR TOWARES THE NORTH: Plot No. 3
ON OR TOWARES THE SOUTH: 11.0 mtr. Wide Road
SECOND SCHEULE ABOVE REFERRED TO

On the property described in the first schedule hereinabove a building known as "SAGAR VIHAR" (Stilt+7) which building is constrcted on this builling the flat No. C-402, Wing-C on Fourth floor, 33.816 sq. mtr. Carpet area and 40.579 sq mtr Built up area and 2.745 sq. mtr Terrace area (Built up)

वरील निवासी सदनिका आणि व्यापारी गाळे संदर्भात अर्जदार यांना वारस दाखला मिळणे करीता या मे न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे. तरी अर्जदार यांना वारस दाखला देण्याबाबत कुणाची कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास सदरची ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत न्यायालयात योग्य त्या कागदपत्रकासह सादर करावी. मुदतीत हरकत न आल्यास अर्जदारांकडून कायदेशीर साक्षी पूरावे नोंदवून अर्जदार यांना वारस दाखला प्रदान करण्यात येईल याची तमाम जनतेने नोंद घ्यावी.

आज दिनांक ०६/१२/२०२५ रोजी कोर्टाच्या सहिशिक्क्याने दिली.

**सही/-**
**क.लिपीक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

---

अॅड.प्रदीप तु. मुंडकर
अर्जदार तर्फे वकील

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे. दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्रं.१५७४/२०२५
नि.नं.७/ड
ने.ता.१६/०१/२०२६

१) कु ध्रुव संजय पाटील
वय वर्षे १९, धंदा शिक्षण
२) कु. जुईली संजय पाटील
वय वर्षे २३, धंदा शिक्षण
अं.क्र. १ व २. रा. चिंचपाडा.
(वडघर) ता पनवेल, जि. रायगड अर्जदार

१) है. वनिता संजय पाटील यांचा अर्जदार क्रं. १ हा मुलगा असुन अर्जदार क्रं. २ ही मुलगी आहे.

२) कै वनिता संजय पाटील यांचे दिनांक २८/०९/२०२४ रोजी, साई सहवास बिल्डींग, रूम नं. १०१. प्लॅाट नं. २२३, सेक्टर क्रं. आर. १, वडघर, ता. पनवेल, जि. रायगड येथे मयत झाले आहे. कै. वनिता संजय पाटील यांचे अर्जदार हेच कायदेशीर वारसदार असुन या अर्जदारां व्यतिरिक्त कै. वनिता संजय पाटील यांस आणखीन कोणीही वारसदार नव्हते व नाहीत.

३) कै.वनिता संजय पाटील यांचे पती मयत संजय रामदास पाटील व इतर यांची वडीलोपार्जित कोष्टक (अ) मधिल खालील वर्णनाची शेतजमीन मिळकत ही शासन/सिडको नवी मुंबई प्रकल्पासाठी संपादीत केलेली आहे.

**कोष्टक (अ) मौजे : वडघर, ता. पनवेल, जि. रायगड**

| गावाचे नाव | स.नं. | हि.नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | यु.केस नं. |
|---|---|---|---|---|
| वडघर | ४१ | ४ | ०-२८-८ | ११० |
| | ६७ | २ | १-२०-५ | |
| | ४२ | १ | ०-२९-६ | ११० |
| | १०१ | ३ | ०-२३-३ | ९९ |
| | ४१ | ५ | ०-०१-० | ११० |
| | १०१ | ७ | ०-२०-२ | |
| | १०३ | ३ ब+७ ब+८ | ०-१६-० | |

तसेच कै. वनिता संजय पाटील यांचे पती मयत संजय रामदास पाटील व इतर यांची वडीलोपार्जित कोष्टक (ब) मधील वर्णनाची शेतजमीन मिळकत ही शासनाने सिडको नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पासाठी संपादीत केलेली आहे.

**कोष्टक (ब) मौजे पारगाव डुंगी, ता. पनवेल, जि. रायगड**

| गावाचे नाव | स.नं. | हि.नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | यु.केस नं. |
|---|---|---|---|---|
| पारगाव डुंगी | ३६ | ७ | ०-२२-९ | ४ |
| पारगाव डुंगी | ३९ | ३ | ०-२०-२ | |

अर्जदारांचे महणणे असे की, कोष्टक (अ) मधील नमुद संपादीत शेतजमीनीच्या संपादनाबाबत सिडकोच्या गावठाण विस्तार योजने अर्तगत १२.५ टक्के भूखंड मिळणार आहीत तसेच कोष्टक (ब) मधिल संपादीत शेतजमीनीच्या संपदनाबाबत सिडकोच्या नमुंआंवि प्रकल्पाअंर्तगत २२.५ टक्के योजने प्रमाणे भूखंड मिळणार आहेत.

तसेच वडघर, हद्दीतील चिंचपाडा हे गाव शासना तर्फे सिडको नवी मुबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पांकरीता संपादीत करण्यात आलेले असुन मयत वनिता संजय पाटील यांचे मयत पत्ती कै. संजय रामदास पाटील यांचे चिंचपाडा (तळावपाली) येथिल घर संपादीत करण्यात आलेले आहे. सिडकोने केलेल्या सर्वेक्षणानुसार सदर घरास बांधकाम क्रमांक T-98 त्याचा यूनिक नं. CHIT-OC-64 असा दिलेला असुन त्याबाबत गाव पुनर्वसन योजनेतील पुष्पक नोड वडघर, भूखंड क्रं. २२३, सेक्टर कं. R1 एकुण क्षेत्र २०० (चौ.मी.) हा भूखंड मंजूर करण्यात आलेला आहे.

४) वर कलम ३ मधील नमूद शेतजमीन ही नवी मुंबई प्रकल्पाकरीता संपादीत झालेली असुन याबाबत सिडकोच्या गा.वि. योजने अंतर्गत मिळणारे १२.५ टक्के योजनेतील भूखंड तसेच नमुंआंवि प्रकल्पाअंर्तगत २२.५ टक्के योजणे प्रमाणे मिळणारे भुखंड तसेच कै. वनिता संजय पाटील यांचे नावे/हिश्यास असलेल्या सिडकोच्या नमुंआवि प्रकल्पाअंर्तगत पुनः र्वसन योजनेतील भुखंडा बाबतचे मिळणारे लाभ व आर्थिक फायदे मिळवून घेण्याकरीता अर्जदार यांनी तसा वारसदाखला मिळण्याकरीता दिवाणी चौकशी अर्ज क्रं.१५७४/२०२५ पनवेल येशील में दिवाणी न्यायाधीश व स्तर यांच्या कोर्टात दाखल केलेला आहे.

त्याअर्थी सदर वर नमूद केलेल्या मिळकतीं बाबत अर्जदार हे मयत वनिता संजय पाटील यांचे वारसदार असल्याबाबत अर्जदार यांचे नावाने वारस दाखला देण्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांचे आत या मे. न्यायालयात हजर राहून हरकत कळवावी. वरील मुदतीत हरकत न आल्यास नोटीसीच्या मुदतीनंतर अर्जदार यांचे नावाने वारस दाखला दिला जाईल मात्र मागाहून कोणाचीही हरकत किंवा तकार ग्राहय धरली जाणार नाही.

आज तारीख ०५/१२/२०२५ रोजी माझ्या सही शिक्क्यानिशी दिली.

**सही/-**
**क.लिपीक**
**दि.न्या.क.स्तर, पनवेल**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.क.स्तर, पनवेल**

---

मा. राणे सो कोर्ट

प्रो. जमा. ६-२५ अर्जदाराचे वकील
कु. दिपाली रामदास गावंड
वकील उच्च न्यायालय

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे. दिवाणी न्यायाधीश (व-स्तर) यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्रं.१६२८/२०२५
नि.नं.८
ने.ता.१२/०१/२०२६

१) श्रीमती. गुलाब नागनाथ म्हात्रे
वय ६० वर्षे, धंदा गृहीणी
२) श्री. संदीप नागनाथ म्हात्रे
वय ४२ वर्षे, धंदा- व्यवसाय
३) श्री. निलेश नागनाथ म्हात्रे
वय ३२ वर्षे, धंदा-व्यवसाय
४) कु. योगिता नागनाथ म्हात्रे
वय ३९ वर्षे, धंदा-गृहिणी
सर्व रा. कामोठे, ता. पनवेल, जि. रायगड,
५) सौ. उज्वला गणेश माळी
पूर्वाश्रमीची कु. उज्वला नागनाथ म्हात्रे
वय ३७ वर्षे, धंदा-गृहिणी
रा. आजिवली, ता. पनवेल, जि. रायगड.
६) कै. सारीका पांडूरंग कोंडीलकर मयत तर्फे वारस
६/१) कु. प्रतिका पांडूरंग कोंडीलकर
वय २२ वर्षे, धंदा-काहीनाही
६/२) कु. प्रणिल पांडूरंग कोंडीलकर
वय १९ वर्षे, धंदा-शिक्षण
दोघेही रा. कुडावे, ता. पनवेल, जि. रायगड अर्जदार
विरूद्ध
कोणीही नाही सामनेवाला

ज्याअर्थी कै. नागनाथ शिवा म्हात्रे हे दिनांक ०६/०१/२००६ रोजी मौजे कामोठे, ता. पनवेल, जि. रायगड येथे मृत्यू पावले असून त्यांचे नावे खालील वर्णनाची मिळकत आहेत.

**मिळकतीचे वर्णन**
**'परिशिष्ट अ'**
**मौजे. कामोठे, पनवेल, ता पनवेल, जि.रायगड**

| अ. क्रं. | युनिट केस क्रं. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. |
|---|---|---|---|---|
| १ | कामोठे २३ | १७१ | २ | ०-०५-१२ |
| | | १७१ | ३ | ०-०३-०० |
| | | १७३ | २ | ०-०७-०४ |
| | | १७३ | ३ ब | ०-१३-०४ |
| | | १७५ | ३ | ०-०९-०८ |
| | | १८७ | ६ | ०-०४-०८ |
| | | १८९ | ४ | ०-१८-०४ |
| | | ४४ | ४ | ००-०५-०४ |
| | | ४५ | ४ ब | ००-१३-१२ |
| | | ५३ | ४+६ ब | ००-०८-०४ |
| | | ६१ | ७ प | ०-००-०४ |
| | | ६२ | २ प | ००-०४-०४ |
| | | ६२ | ३ प | ००-००-०८ |
| | | ६४ | ४ ए + ६ प | ००-०८-०० |
| | | ६५ | ११ | ०-०६-०० |
| | | ६८ | ७ | ००-०८-०० |
| | | ६८ | २० | ००-२०-०० |
| | | ७३ | १ | ००-२७-०० |
| | | ७३ | ८ ब | ००-१३-१२ |
| | | ७३ | ९ | ००-१२-०८ |
| | | ७४ | ८ प | ००-१२-०८ |
| | | ८४ | ३ | ००-१२-०८ |
| | | ८५ | ३-७-४-५/ए १७-१२-१५-१३ | ०१-०५-०० |
| | | १३१ | ६ | ००-०९-१२ |
| | | १३७ | ५ | ००-०२-०४ |
| | | १३९ | ६ | ००-०४-१२ |
| | | १३९ | १० | ००-०८-०८ |
| | | १४५ | ७ | ००-०५-०८ |
| | | १५० | २ | ००-०३-०४ |
| | | १५२ | २+४+५ | ००-२७-०० |
| | | १५३ | १ | ००-०२-१२ |
| | | १५६ | ३ | ००-०२-०० |
| | | ३६४ | १ | ००-०८-०० |
| | | ८४ | १ ब | ००-१४-०८ |
| २ | कामोठे २३(१) | ८३ | ७ | ००-०६-१२ |
| | | ८४ | ४ ब | ००-०५-१२ |
| ३ | कामोठे २३(२) | ८२ | ८ | ००-०६-०० |
| | | ८२ | ७ | ००-०५-१२ |
| | | ८२ | ५ | ००-०८-०४ |
| | | ७९ | १+२ अ | ००-०८-०० |
| | | ७५ | २+३+११+१४+१६+१८अ | ००-३३-०८ |
| ४ | पनवेल ४६५ | ६२२ | १३ | ००-२९-०८ |

**'परिशिष्ट ब'**
**मिळकतीचे वर्णन**
**मौजे कामोठे, ता पनवेल, जि. रायगड**

१) मौजे कामोठे, ता. पनवेल, जि. रायगड येथील पनवेल महानगपालिका हद्दीतील घर क्र. १०७९ (जुना मालमत्ता क्र. १९), क्षेत्र ७४८ चौ. फुट ही मिळकत.

२) मौजे कामोठे, ता. पनवेल, जि. रायगड येथील पनवेल महानगपालिका हद्दीतील घर क्र. १०८० (जुना मालमत्ता क्र. १९अ), क्षेत्र १००० चौ. फुट ही मिळकत.

कै. नागनाथ शिवा म्हात्रे हयांचे मृत्यूपश्यात त्यांस अर्जदार हे वारस आहेत. सदर वारसांव्यतिरिक्त इतर कोणीही वारसदार नाहीत. सबब, अर्जदार हे सदरचा वारस दाखला मिळण्यासाठी अर्ज करीत आहे. सदर वारसांव्यतिरिक्त इतर कोणीही वारसदार नाहीत. सबब, सदरचा वारस दाखला अर्जदार यांस देण्यासंबंधी कोणाही इसमाच्या कोणत्याही हरकती असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाले पासून ३० दिवसांचे आत या न्यायालयात सादर कराव्यात. मुदतीत हरकती न आल्यास कोणत्याही हरकती नाहीत असे समजून अर्जदार यांस वारस दाखला देण्यात येईल व मागाहून येणाऱ्या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही.

आज तारीख ०६/१२/२५ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिली.
ठिकाण - पनवेल
दिनांक-६/१२/२०२५

**सही/-**
**क.लिपीक**
**दि.न्या.क.स्तर, पनवेल**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.क.स्तर, पनवेल**

# पाच महिने संपले तरी समुद्र शांत नाही; मच्छिमारांच्या पोटावरच घाव

**दै.रायगड नगरी । विजय गिरी**

**श्रीवर्धन ।** कोकणचा किनारा आज काळवंडला आहे समुद्र शांत असताना उपजीविका देतो, पण रौद्रावतार धारण केला की हजारो घरांची चूल विझवतो. रायगड जिल्ह्यातील मच्छिमार बांधवांवर अशीच परिस्थिती आज ओढवली आहे. सलग वादळांच्या तडाख्यामुळे संपूर्ण हंगाम पाच महिने उलटूनही सुरूच होऊ शकलेला नाही!



प्रत्येक वादळाने किनारी पोटापाण्यावर जगणारे भरटखोल, श्रीवर्धन, बागमंडला, मेंदडी, दिघी, जीवना बंदर, मुळगाव, वाशी, दिवेआगर, शेखाडी, कुडगाव येथील मच्छिमार अक्षरशः उद्ध्वस्त झाले आहेत. वादळे, अस्थिर हवामान, उंच लाटा समुद्रात उतरणे म्हणजे मृत्युला निमंत्रण. किनाऱ्यावर शेकडो बोटी नांगरलेल्या आहेत. दुरुस्तीचा खर्च, डिझेलचे दर, बर्फाचे दर सर्व आकाशाला भिडले आहेत. समुद्रात गेलो तर प्राण जातो, नाही गेलो तर लेकरं उपाशी मरतात! हा आवाज फक्त एका घराचा नाही, तर संपूर्ण कोकणाचा आहे.

मासे नाहीत बर्फ कारखाने ठप्प, वाहतुकीला काम नाही रिक्षा/टेम्पोवाल्यांना रोजंदारी नाही, बाजार रिकामे हातगाडीवाले, व्यापारी विक्रीशिवाय, महिला मच्छीविक्रेत्या घराचा चूल-धुराही नाही एका मच्छिमाराचं जाळं थांबलं की शंभर घरांची भांडी रिकामी होतात. आज याच भीषण वास्तवाशी रायगड सामना करतोय. मच्छिमार बांधवांकडून तातडीच्या खालील मागण्या पुढे सरसावल्या आहेत . डिझेल सवलत तात्काळ लागू करावी, जाळी व बोट दुरुस्ती अनुदान वाढवावे, थकलेली कर्जे माफ करावी, आपत्ती निवारक निधीतून थेट आर्थिक मदत, बंद हंगामातील जीवनावश्यक भत्ता पुन्हा सुरू करावा केंद्र व राज्य शासनाने तातडीने विशेष ‘कोकण मत्स्यव्यवसाय आपत्ती पॅकेज’ जाहीर करणे अपरिहार्य झाले आहे.

### महाराष्ट्र आणि गोवा नोटरी असोसिएशनच्या प्रयत्नांना यश

# नोटरी मुद्रांक तिकिटे राज्यातील सर्व उपकोषागारांत मिळणार

**दै.रायगड नगरी । पनवेल**

महाराष्ट्रातील नोटरीसाठी दिलासादायक ठरणारा महत्त्वाचा निर्णय बुधवारी जाहीर झाला आहे. नोटरी मुद्रांक तिकिटे (नोटरी स्टॅम्प) आता राज्यातील सर्व उपकोषागार कार्यालयांत उपलब्ध होणार आहेत. लेखा व कोषागारे संचालनालयाच्या कोकण विभागाने यासंदर्भातील आदेश बुधवारी जारी केले आहे. या आदेशानुसार प्रत्येक जिल्ह्यातील उपकोषागारातून नोटरी मुद्रांक तिकिटांचा पुरवठा व विक्री प्रक्रिया तात्काळ सुरू करण्याचे निर्देश दिले आहेत. राज्यभरातील नोटरी कामकाज अधिक सुलभ, गतिमान व लोकाभिमुख करण्याच्या दिशेने हे महत्त्वाचे पाऊल मानले जात आहे.

आतापर्यंत नोटरी मुद्रांक तिकिटे केवळ मुंबईतील मुख्य मुद्रांक पुरवठा कार्यालय किंवा मर्यादित ठिकाणी उपलब्ध होत होते. तसेच पनवेल, उरण, खालापूर आणि कर्जत तालुक्यातील पब्लिक नोटरी वकिलांना सध्या नोटरी तिकिटांसाठी अलिबाग येथील जिल्हा कोषागार कार्यालयात जावं लागतं. ही तिकीट पन-वेल येथील उपकोषागार कार्यालयात उपलब्ध करून द्यावीत याबाबतचे निवेदन दि १८ एप्रिल २०२५ रोजी महाराष्ट्र आणि गोवा नोटरी असोसिएशन यांच्यातर्फे सहसंचालक, लेखा व कोषागारे, कोकण विभाग कोकण भवन, सीबीडी बेलापूर यांना देण्यात आले. यावेळी सहाय्यक संचालिका मॅडम श्रीमती गौरी अ. वारे यांनी याबाबत लवकरच योग्य ती कार्यवाही करून आपली मागणी पूर्ण करण्याचं विश्वासपूर्वक आश्वासन दिलं होतं.




यावेळी महाराष्ट्र व गोवा नोटरी असोसिएशनचे राज्य अध्यक्ष सय्यद सिकंदर अली यांच्या मार्गदर्शनाखाली ॲड. नागेश हिरवे, रायगड जिल्हाध्यक्ष, ॲड. अस्मिता भुवड, महिला जिल्हाध्यक्ष रायगड, ॲड. रोहिदास आगलावे, पनवेल तालुका अध्यक्ष ॲड. सारिका लबडे, खालापूर तालुका अध्यक्ष, तसेच पनवेलचे नोटरी वकील ॲड. जानकर, ॲड. ज्योती उरणकर, ॲड. आर के पाटील, ॲड. कुंडलिक मोहिते, ॲड. निवृत्ती पावशे तसेच असोसिएशनचे इतर पदाधिकारी उपस्थित होते. यासाठी महाराष्ट्र आणि गोवा नोटरी असोसिएशन तर्फे सातत्यपूर्ण पाठपुरावा सुरू ठेवला होता. लेखा व कोषागारे संचालनालयाने याची दखल घेऊन नोटरी स्टॅम्प उपकोषागार कार्यालयांत उपलब्ध करून देण्याचे आदेश जारी केले आहेत.

याबाबत अधिक माहिती देताना संघटनेचे प्रवक्ते व कोकण विभागाध्यक्ष ॲड. समीत राऊत म्हणाले, नोटरी स्टॅम्प मिळवण्यासाठी नोटरी वकिलांना जिल्ह्याच्या ठिकाणी जावे लागत होते. ग्रामीण व उपनगरातील नोटरींसाठी ही प्रक्रिया खर्चिक आणि वेळखाऊ होती. आता ही सुविधा प्रत्येक तालुक्यातील उपकोषागारात उपलब्ध झाल्याने हजारो नोटरींना दिलासा मिळणार असल्याचे सांगितले.

# कोण पटकावणार बहुमानाचा ‘अटल करंडक’?; महाराष्ट्राची उत्सुकता शिगेला

**दै.रायगड नगरी । पनवेल**

शहरातील आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ पुरस्कृत आणि अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद पनवेल शाखा व चांगू काना ठाकूर महाविद्यालय (स्वायत्त) यांच्या संयुक्त विद्यमाने सुरु असलेल्या १२ व्या राज्यस्तरीय अटल करंडक एकांकिका स्पर्धेच्या महाअंतिम फेरीचा पारितोषिक वितरण समारंभ रविवार दिनांक ०७ डिसेंबरला सायंकाळी ०४ वाजता होणार असून यंदाचा बहुमानाचा राज्यस्तरीय अटल करंडक कोण पटकावणार? याची उत्सुकता संपूर्ण महाराष्ट्राला लागली आहे.



महाअंतिम फेरीच्या पहिल्या दिवशी वसंतराव नाईक विज्ञान संस्था नागपूरची एकांकिका 'वि. प्र', मुलुंड वाणिज्य विद्यालय 'स्वातंत्र्य सौभाग्य', मिथक मुंबईची 'कारण काय', एकदम कडक नाट्य संस्था भाईंदरची ' बकेट लिस्ट',, वि. ग. वझे विद्यालय मुलुंडची 'द गर्दभ', आर्टस कॉमर्स अँन्ड सायन्स कॉलेज साताराचे 'सोयरीक', नाट्य स्पर्श आणि भवन्स महाविद्यालय अंधेरीची 'प्रतीक्षायान', राजाराम बापू अभियांत्रिकी महाविद्यालय इस्लामपूरची 'हाफ वे', कलादर्पण पनवेलची 'आख्यान- ए - झुरळ', आणि रेवन एंटरटेनमेंट पुणेची 'सांग रहियो' या दहा एकांकिकांचे सादरीकरण होते. शनिवारी अभिनय नाट्यकला लोंढे चाळीसगा-वचची 'गाईड', नक्षत्र कला मंच मुंबई 'स्पर्शाची गोष्ट', नाट्यंकुर मुंबई 'पाकिस्तानचे यान', सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालय ठाणे 'थिम्मक्का', साठे महाविद्यालय विलेपार्लेची 'अमिग्डला', अलडेल एज्युकेशन ट्रस्ट सन जॉन कॉलेज पालघर 'हॅशटॅग इनोसंट', कलांश थिएटर घाटकोपरची 'मढ निघाले अनुदानाला', कलाकार मंडळी पुणे 'नाटेक', मॉडर्न महाविद्यालय गणेश खिंड पुणेची 'वामन आख्यान', स्वभाव कल्याण 'श्री गणेशा' बाबी अमर हिंद मंडळ दादरची 'रेशनकार्ड' या एकांकिकांचे सादरीकरण होते. तर अंतिम दिवशी म्हणजे रविवारी रंग पंढरी पुणेची 'बरड', नाट्यऋणी आणि विवेक वाणिज्य महाविद्यालय गोरगावची 'शपथ घेतो की', सीकेटी ठाकूर स्वायत्त महाविद्यालय नवीन पन-वेलची 'कीचकवध' आणि डॉक्टर ग्रुप बीएमसी हॉस्पिटल मुंबईची 'सपान' या एकांकिका सादर होणार आहे. राज्यभरातील १०० हून अधिक एकांकिकांमधून निवड झालेल्या २५ दर्जेदार एकांकिकांमध्ये रोमांचक स्पर्धा रंगली आहे. त्यामुळे यंदाचा अटल करंडक कोण जिंकणार याची उत्सुकता अवघ्या महाराष्ट्राला लागली आहे.

# खोपोली भाजप उमेदवारांनी घेतली आ.प्रशांत ठाकूर यांची सदिच्छा भेट

**दै.रायगड नगरी । पनवेल**

खोपोली नगर परिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ च्या माध्यमातून भारतीय जनता महायुतीच्या सर्व उमेदवारांनी भाजप निवडणूक निरीक्षक अँड.प्रकाश बिनेदार यांच्या माध्यमातून निवडणुकी अंती पक्ष संघटना सक्षम व मजबूत करण्याचा निर्धार करीत आमदार प्रशांत ठाकूर व उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांची मार्गदर्शन रुपी सदिच्छा भेट घेतली.



यावेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी खोपोली नगरपरिषद निवडणुकीच्या महायुतीतील लढतीबाबत विविध विषयांना हात घालत उपस्थित सर्वांचे प्रोत्साहन रुपी मनोबल वाढवले. भाजपच्या सर्व उमेदवारांचे व त्यांना निरीक्षक म्हणून नियोजनबद्ध मार्गदर्शन करणारे जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी,अँड. प्रकाश बिनेदार, सुनील घरत व सय्यद अकबर आणि सर्व सहकारी वर्गाचे विशेष कौतुक केले. यावेळी आपण सर्वांनी हि पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांचे आदर्श समोर ठेवून महिन्यातून एकदा तरी पक्षाच्या माध्यमातून जनसंवाद,चर्चा व्हावी व संघटनात्मक वैचारिक बळ मिळावे या उद्देशाने मन की बात सारखे कार्यक्रम घ्यावे, जनेतच्या मनात भाजप पक्षाच्या सकारात्मक विचारांना पोहचविण्याचा प्रयत्न करावे अशी अपेक्षा व्यक्त केली. आपण सर्वांनी या पुढे शहराच्या विविध प्रभागातील उपक्रमांत पक्षाच्या सर्व कार्यक्रमात सहभागी होत सक्षम संघटना उभारावी असे सांगत पुढील राजकीय वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांनी शुभेच्छा रुपी मार्गदर्शन करताना शहर व जिल्हा कार्यकारणी मध्ये आपल्या माध्यमातून वेगवेगळ्या जबाबदाऱ्या पार पाडायचे असल्याचे सांगत पार पडलेल्या निवडणुकीत यशस्वी नियोजना सारखेच भाजप पक्ष संघटना वाढीसाठी प्रयत्न करूया असे सांगितले.

खोपोली भाजप महायुतीच्या सर्व उमेदवारांनी भाजप निवडणूक निरीक्षक अँड.प्रकाश बिनेदार व सर्व सहकाऱ्यांची विशेष कौतुक करीत पक्ष संघटनेच्या कार्यपद्धतीवर प्रभावित होत शहरात अनेकांचे पक्ष प्रवेश होणारं असल्याचे सांगत प्रभाग ०५ मधून अभिषेक कासार व प्रभाग ११ मधून अमान शेख यांच्या सह शहरातील विविध कार्यकर्त्यांचे आमदार प्रशांत ठाकूर व उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांच्या हस्ते पक्ष प्रवेश केले. पूर्ण ताकतीने निवडणूक लढविण्याचा बळ देण्यासाठी सर्वांच्या वतीने लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे मार्गदर्शन व आशीर्वाद लाभल्याने सर्वांच्या वतीने आमदार प्रशांत ठाकूर यांना शाल पुष्पगुच्छ देऊन त्यांचे विशेष आभार मानले.यावेळी सर्वांनी पनवेल भाजप कार्यालयातील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून महापरिनिर्वाण दिनानिमित्ताने पुष्प अर्पण करून घोषणा देत अभिवादन केले.

यावेळी भाजपा अल्पसंख्यांक मोर्चा प्रदेश उपाध्यक्ष सय्यद अकबर, भाजप खोपोली शहर अध्यक्ष अजय इंगुळकर, शहरातील ज्येष्ठ नेते इंदरमलशेठ खंडेलवाल, रायगड जिल्हा सदस्या रसिका शेट्ये, माजी नगरसेवक रमेश रेटरेकर, महिला शहराध्यक्ष अश्विनी अत्रे, जिल्हा सदस्या स्नेहल सावंत, भाजप शहर मंडळाचे संजय म्हात्रे,अपर्णा साठे, नामदेव मोरे, संदेश पाटील, निलेश दळवी तसेच भाजप महायुतीतून उमेदवारी लढविणारे पदाधिकारी, विक्रम साबळे, सोनिया रुपवते, सानिया शेख, किशोर पाटील ,संजय तन्ना, प्रतीक्षा रेटरेकर, सुजाता मोरे व इतर अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# श्री शिवगिरी सेवा संस्थान, पनवेल तर्फे दत्त जन्मोत्सव साजरा

**दै.रायगड नगरी । पनवेल**

श्री शिवगिरी सेवा संस्थान पनवेल यांच्या विद्यमाने गुरुवार दिनांक ४ डिसेंबर २०२५ रोजी सनातन संकुल, देवद येथे दत्त जन्मोत्सव साजरा करण्यात आला.



श्री शिवगिरी सेवा संस्थान,संस्थापक अध्यक्ष कै. दिलीप उर्फ दादा शंकर खोत यांनी प्रथम मुंबई येथे चाळीस वर्षापूर्वी सुरू केलेला हा दत्त जन्मोत्सव त्यांच्या पश्चात पनवेल मध्ये आजही जवळपास २३ वर्षांपासून सुरू आहे. या उत्सवानिमित्त अनेक धार्मिक कार्यक्रम श्री दिगंबर पांगारकर गुरुजी यांचे पौरोहित्यने करण्यात आले.मुंबई ,ठाणे, सातारा, रत्नागिरी इत्यादी ठिकाणाहून आलेल्या भाविकांनी पालखी सोहळ्याला आवर्जून उपस्थिती लावली. या शिवगिरी सेवा संस्थानचे वतीने रक्तदान शिबिर, कोविड काळात अन्नधान्य वाटप, पॉवरलिफ्टिंग संघटनेला स्पर्धेसाठी मदत, गोवंश बचाव समितीला आर्थिक सहाय्य, पटवर्धन रुग्णालयाला व्हील चेअर देणे, वृद्धाश्रमाला देणगी असे अनेक सामाजिक उपक्रमही वेळोवेळी राबविण्यात आलेले आहेत.

यंदा हा उत्सव मंडळाचे सदस्य सामाजिक कार्यात सदा सहभागी असणारे नवीन पनवेल चे उदय सावंत आणि नेरे येथील रहिवासी असलेले भंडारी समाजाचे सदा हसतमुख कार्यकर्ते सुभाष खोत यांच्या आयोजनाखाली साजरा झाला.यंदाच्या श्री सत्यदत्त पूजेचा मान कळंबोली येथील श्री हनुमंत जाधव व सौ. लीलाताई जाधव या दांपत्याने भूषविला.या उत्सवाच्या पालखी सोहळ्याला कामोठे येथील हिरकणी लेझीम पथक यांची उपस्थिती लक्षवेधक होती. या सर्व कार्यक्रमांची रूपरेखा मंडळाचे विद्यमान अध्यक्ष प्रसाद दिलीप खोत (उद्योजक), सेक्रेटरी शिवानंद प्रभू, खजिनदार मिलिंद पांचाळ आणि जेष्ठ सदस्य बाळकृष्ण धामापूरकर काका यांनी केले होते.

# दिवाना तेरा आया, बाबा तेरी शिर्डी में गाण्याने पेणचे हजारों साई भक्त मंत्रमुग्ध

**दै.रायगड नगरी । पेण**

दिवाना तेरा आया, बाबा तेरी शिर्डी में या संपूर्ण देशात गाजलेल्या गाण्याने पेणसह रायगड जिल्ह्यातील हजारों साई भक्त मंत्रमुग्ध झाले. ओम साई पदयात्रा मित्र मंडळ तर्फे भव्य साई भंडाऱ्याचे साई सहारा रेस्टॉरंट, पेण येथे भक्तिमय वातावरणात संपन्न झाला. जिल्ह्यातील हजारों साई भक्तांची उपस्थिती असलेल्या या कार्यक्रमासाठी दिल्लीवाले प्रसिद्ध गायक सुफि ब्रदर्स यांनी गायनाचा कार्यक्रम भक्तिमय वातावरणात सादर केला.

साई भंडारा कार्यक्रमाला सायंकाळी ६.०० वाजता श्री साई भजनाने सुरुवात होऊन सायंकाळी ७.३० वाजता हजारो महिला-पुरुष व आबालवृद्ध साई भक्तांच्या उपस्थितीत बाबांची धूप आरती झाली. तर रात्री ९.०० वाजता श्री साई भंडाऱ्यानिमित्त महाप्रसाद संपन्न झाला.

सदर साई भंडाराला विशेष आकर्षण म्हणून हम्सर हयात, अथर हयात निजामी व सुफि ब्रदर्स (दिल्लीवाले) यांनी भजनसंध्या व ऑर्केस्ट्रा सादर करत माझे साई बाबा, साई का दीदार, चढता सूरज ढळता, दिवाना तेरा आया बाबा तेरी शिर्डी में अशी अनेक गाणी गात उपस्थित हजारो साई भक्तांना अनोखा भक्तिरसाचा अनुभव दिला. सर्व साईभक्तांनी या भक्तिमय साई भंडारा कार्यक्रमाचा लाभ घेत आनंद लुटला. सदर साई भंडारा कार्यक्रमाचे यशस्वी नियोजन ओम साई पदयात्रा मित्र मंडळाचे सर्वेसर्वा कल्पेश ठाकूर, मितेश भानुशाली व सर्व सदस्यांनी केले.



# प्लसवाल्यांनो सबुरीने खेळा : महेंद्रशेठ घरत

**दै.रायगड नगरी । विठ्ठल ममताबादे**

**उरण ।** फोर्टीप्लस, फिफ्टी प्लसवाल्यांनो सबुरीने खेळा. वयाचाही विचार करा, जमेल तेवढेच धावा, कारण जर का या वयात दुखापत झाली तर 'चार आण्याची कोंबडी आणि बारा आण्याचा मसाला' लागेल. तब्येत महत्त्वाची, त्यामुळे ऊर फुटेस्तोवर धावू नका, असा जिवाभावाचा सल्ला आंतरराष्ट्रीय कामगार नेते आणि काँग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्रशेठ घरत यांनी पनवेल तालुक्यातील वहाळ येथे क्रिकेट खेळाडूंना दिला.

ते पुढे म्हणाले, मी ना आमदार ना खासदार, पण अनेक गावांना सिडकोकडून मैदाने मिळवून दिलीत. त्यामुळे दोन आमदार नेमके करतात काय? पुढच्या पिढीचा विचार करून प्रकल्पग्रस्त भूमिपुत्रांच्या गावांना त्यांनी किमान मैदाने तरी मिळवून द्यावीत.



फोर्टीप्लस मास्टर्स चषक क्रिकेट स्पर्धे वेळी शनिवारी (ता. ६) महेंद्रशेठ घरत बोलत होते.

दिगंबर स्मृती फोर्टीप्लस मास्टर्स क्रिकेट क्लब वहाळच्या वतीने क्रिकेट स्पर्धा आयोजित केली आहे. दिवंगत रमणशेठ घरत मैदान वहाळ येथे क्रिकेट स्पर्धांचे आयोजन शैलेश चिर्लेकर, मनोज दापोलकर, विजय घरत, मदन घरत, ज्ञानेश्वर पाटील, कपिल पाटील आणि फोर्टीप्लस वहाळ संघाने केले आहे.

मनोज म्हात्रे यांनी समालोचक म्हणून भूमिका निभावली आहे.

# महाराष्ट्रातील नामवंत कीर्तनकार स्त्रीभ्रूण हत्येवर करणार कीर्तनातून प्रबोधन

**दै.रायगड नगरी । उरण**

बेलपाडा येथील तुकाराम घरत यांच्या निवासस्थानी सालाबाद प्रमाणे यंदाही ३६ व्या वर्षात बेलपाडा येथील श्रीकृष्ण वारकरी हरिपाठ मंडळाच्या वतीने सालाबाद प्रमाणे यंदाही अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले असून, तुकोबाराय गाथा पारायणाचे वाचन होणार आहे. त्या अनुषंगाने काल शुक्रवार ५ डिसेंबर रोजी अखंड हरिनाम सप्ताहाला प्रारंभ झाला आहे.. हा अखंड हरिनाम सप्ताह १२ डिसेंबर २०२५ पर्यंत चालणार आहे.यंदाचे हे ३६ वे वर्ष हे त्रिपपुर्ती सोहळा म्हणून साजरा करण्यात येत आहे.

अखंड सप्ताहामध्ये काकड आरती, गाथा पारायण, संगीत भजन, हरिपाठ अशा विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून, या सप्ताहात खास करून, सुप्रसिद्ध कीर्तनकार ह भ प संतोष महाराज (सातारा) हभप कृष्णा महाराज (खोपोली) ह भ प गणेश महाराज (भिवंडी)ह भ प उल्हास सूर्यवंशी महाराज (आळंदी) ह भ प चैतन्य महाराज (खंडागळे चौक) आचार्य ह भ प प्रल्हाद महाराज शास्त्री, ह भ प मारुती महाराज, ह भ प विक्रांत महाराज (कल्याण) या महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध नामांकित कीर्तनकारांची किर्तन सेवा आयोजित करण्यात आली आहे.